स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड .

सामाजिकशास्त्रे विद्याशाखे अंतर्गत इतिहास विषयातील पीएच.डी.(विद्यावाचस्पती)
पदवीसाठी सादर करावयाचा संशोधन आराखडा

संशोधनाचे शीर्षक

“पद्मश्री डॉ.नरेंद्र दाभोलकर जीवन आणि कार्य – एक ऐतिहासिक अभ्यास.”

(इ.स. १९४५ ते २०१३)

संशोधक विद्यार्थी

आत्राम सतिश नामदेवराव

बी.ए , बी.एस.सी ,बी.एड.

एम.ए.(इतिहास) सेट.

मार्गदर्शक

प्राचार्य डॉ.विठ्ठलराव घुले

राजश्री शाहू महाविद्यालय ,परभणी .

सप्टेंबर -२०२२

“पद्मश्री डॉ.नरेंद्र दाभोलकर जीवन आणि कार्य – एक ऐतिहासिक अभ्यास.”

(इ.स. १९४५ ते २०१३)

प्रस्तावना :

भारताला अगदी प्राचीन काळापासून बुद्धिवादी, विज्ञानवादी, भौतीकवादी विचाराची परंपरा लाभली आहे. अजिता केसकांबळे हे ख्रिस्त पूर्व सहाव्या शतकातील एक प्राचीन भारतीय तत्वज्ञ, बुद्धिवादी व विज्ञानवादी होते. ते भातीय विज्ञानवाद, बुद्धीवादाचे व भौतीकवादाचे समर्थक आणि चार्वाक परंपरेचे अग्रदूत मानले जाते. ते कादाजित बुद्ध आणि महावीराचे समकालीन असावेत. लोकायत तत्वज्ञानाची शिकवण अजिताच्या शिकवणुकीतून मोठ्या प्रमाणात तयार करण्यात आली होती. हे वारंवार लक्षात आले आहे.

महाराष्ट्रास प्राचीन संस्कृती, विचार, भाषा, यांची वैभवशाली परंपरा लाभली आहे. परंतु मध्ययुगीन कालखंडात परकीय आक्रमणामुळे हि परंपरा खंडित झाली. त्यानंतरच्या ब्रिटीशांच्या कालखंडात भारतात हळूहळू जागृतीची भावना निर्माण होण्यास सुरुवात झाली. ही जागृतीची भावना निर्माण करण्याचे सर्वस्वी श्रेय भारतीय समाज सुधारकांचे आहे. विशेषतः महाराष्ट्रात समाज सुधारकांनी समाज जागृतीच्या दृष्टीने वृत्तपत्राचा प्रभावीपणे वापर केला. त्यातून समाज शिक्षणाचे, प्रबोधनाचे कार्य प्रकर्षाने करण्यात आले. त्याचबरोबर तत्कालीन समाजात पसरलेल्या अनेक समाज विघातक रूढी, प्रथा, चालीरीती ह्या आधुनिक समाजाला कशा घातक आणि मारक आहे. हे सकारण पटवून देण्याचा प्रयत्न करण्यात आला.

आधुनिक काळात अब्राहम टी.कोवूर यांच्या विचाराने प्रेरित होऊन बी.प्रेमानंद, प्रबीर घोष, नरेंद्र नायर, प्रा. श्याम मानव आणि डॉ.नरेंद्र दाभोलकर या भारतीय बुद्धीवाद्यांनी वैज्ञानिक विचाराच्या प्रचारासाठी भारतभर दौरे केले. त्यातून त्यांनी धोकादायक अंधश्रद्धांविरुद्ध जागरुकता पसरविण्याचे काम केले. विविध धर्मगुरू आणि त्यांनी केलेले कथित चमत्कार आणि घोटाळे उघडकीस

आणण्याचे काम त्यांनी केले. त्याचप्रमाणे महाराष्ट्रात विज्ञान, निर्भयता आणि नीती हि मानवी मुल्ये समोर ठेऊन डॉ. नरेंद्र दाभोलकर यांनी महाराष्ट्र, कर्नाटक, बेळगाव आणि गोवा इत्यादी ठिकाणी समाजात पसरलेल्या अघोरी, सामाजिक प्रथा, व अंधश्रद्धा निर्मुलनासाठी १९८९ साली समविचारी कार्यकर्त्यांना जमवून 'महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मुलन समिती' हि संघटना स्थापन केली. पुढे याकार्यासाठी त्यांनी स्वताला वाहून घेतले. आणि समाजातील अनिष्ठ व अघोरी प्रथा, जादूटोणा इत्यादीमुळे भोंदूबाबा यांच्याकडून समाजातील सामान्य जनतेचे मानसिक, शारीरिक, आर्थिक नुकसान व शोषण होण्याच्या घटना रोखण्यासाठी शासन स्तरावर प्रयत्न करून कायदेविषयक उपाय योजना करण्यास भाग पाडले होते.

डॉ.नरेन्द्र दाभोलकरांच्या अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीने सामाजिक सुधारणांच्या क्षेत्रात वेगळा ठसा उमटवलेला आहे. त्यांनी केलेले कार्य आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीसाठी कितपत उपयुक्त ठरले याचा चिकित्सक अभ्यास करण्याच्या दृष्टीने प्रस्तुत संशोधनासाठी निवडण्यात आलेला विषय महत्वपूर्ण ठरू शकतो.

समस्या सुत्रण :

इतिहासाच्या संशोधनात लिखीत साधने महत्वाची भुमिका बजावतात. अंधश्रद्धा निर्मुलन चळवळीचा महाराष्ट्रात प्रसार व प्रचार केव्हा आणि कसा झाला ? या चळवळीचे मूळ तत्वज्ञान समाजातील अनिष्ट रूढी, अघोरी प्रथा जादूटोणा या सारख्या समाजात पसरलेल्या वाइट चाली रिती नष्ट करता येणार आहे का ? अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीत, समीतीच्या स्थापनेत व प्रचारात डॉ.नरेंद्र दाभोलकर यांची भूमिका कोणती आहे ? अंधश्रद्धा निर्मुलन चळवळीतील कार्याकार्त्यंची संख्या महाराष्ट्र, बेळगाव, कर्नाटक व गोवा इत्यादी ठिकाणी जास्त आहे का ? यास विसाव्या शतकात महाराष्ट्र, कर्नाटक व गोवा या राज्यात झालेल्या सामाजिक सुधारणा चाळवळी जबाबदार आहे का? महाराष्ट्रातील पुणे, सातारा,

कोल्हापूर, सिंधुदुर्ग, मराठवाडा या प्रदेशातील लोकांचे राजकीय, सांस्कृतिक, कला आणि साहित्य विकासात योगदान आहे का ? अंधश्रद्धा निर्मुलन चळवळीत या प्रदेशातील लोकांचे योगदान कसे राहिले आहे ? यावर संशोधन होऊन ते संशोधन प्रकाशित झाले आहे का ? झाले असल्यास ते संशोधन ऐतिहासिक दृष्टीकोनातून झाले आहे का ? अश्या सर्व प्रकारच्या प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी प्रस्तुत विषय संशोधानासाठी घेतला आहे .

संशोधन विषयाचे महत्व :

प्रस्तुत संशोधनासाठी “पद्मश्री डॉ.नरेंद्र दाभोलकर जीवन आणि कार्य - एक ऐतिहासिक अभ्यास.” (इ.स.१९४५ ते २०१३) निश्चित करण्यात आला आहे. सदर विषय अत्यंत महत्वाचा असून तो डॉ.नरेंद्र दाभोलकर यांच्या जीवन व कार्य, तसेच त्यांनी चालवलेल्या अंधश्रद्धा निर्मुलन चळवळीशी निगडीत आहे. या अभ्यासासाठी त्यांनी अंधश्रद्धा निर्मुलन विषयक विविध ग्रंथ,त्यांनी विविध वृत्तपत्रातून लिहिलेले लेख ,तसेच तत्कालीन वृत्तपत्रांनी,विविध लेखकांनी त्यांच्या चळवळीच्या अनुषंगाने केलेले लेखन यांचा चिकित्सक अभ्यास करण्यात येणार आहे. तसेच अंधश्रद्धा निर्मूलनाच्या माध्यमातून आधुनिक महाराष्ट्राचा सामाजिक,राजकीय,धार्मिक परिवर्तनाचा आढावा घेण्याच्या दृष्टीने प्रस्तुत संशोधन विषयाचे महत्व स्पष्ट होते.

संशोधनाची उद्दिष्टे :

प्रस्तुत संशोधनासाठी काही उद्दिष्टे निश्चित करण्यात आली आहेत. ती पुढीलप्रमाणे आहेत.

१) डॉ.नरेंद्र दाभोलकर यांच्या संघर्षमय जीवनाचा वेध घेणे.

२) विसाव्या शतकातील सुधारणा चळवळीतील डॉ.नरेंद्र दाभोलकर यांच्या कार्याचे वेगळेपण शोधणे.

३) डॉ.नरेंद्र दाभोलकर यांच्या अंधश्रद्धा निर्मुलन चळवळीचा समाजावरील प्रभाव अभ्यासने.

४) डॉ.नरेंद्र दाभोलकर यांचे कार्य आणि विचारातील मानवतावादी दृष्टिकोनाचा शोध घेणे.

५) डॉ.नरेंद्र दाभोलकर यांच्या विचार व कार्याची वर्तमान जीवनातील उपयुक्तता स्पष्ट करणे.

संशोधनाची गृहीतके :

प्रस्तुत संशोधनासाठी काही गृहीतके निश्चित करण्यात आली आहेत. ती पुढीलप्रमाणे आहेत -

१) पद्मश्री डॉ.नरेंद्र दाभोलकर यांच्या चळवळीतून सामाजिक जाणीवा निर्माण होतात.

२) महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मुलन समितीच्या चळवळीमुळे महाराष्ट्रात नव जागृतीची भावना निर्माण होण्यास मदत झाली असल्याचे दिसून येते.

३) डॉ.नरेंद्र दाभोलकरांच्या महाराष्ट्रातील अंधश्रद्धा निर्मूलन विषयक चळवळीच्या माध्यमातून महाराष्ट्रातील समाज सुधारणेस एक निश्चित व नवी दिशा मिळाली असल्याचे दिसून येते.

४) डॉ.नरेंद्र दाभोलाकारांच्या चळवळीतून आधुनिक महाराष्ट्रातील सकल मराठीजनांत वैज्ञानिक दृष्टीकोनाचा विकास होऊन धार्मिक, सामाजिक व नैतिक उन्नतीसाठी चालना मिळाली असल्याचे दिसून येते.

५) डॉ.नरेंद्र दाभोलकर यांच्या अंधश्रद्धा विषयक सुधारणावादी विचारांचा अभ्यास करणे.

६) साने गुरुजी, जयप्रकाश नारायण, युक्रांदचे कुमार सप्तश्री, बी. प्रेमानंद , हमीद दलवाई, अब्राहम कोवूर, जेष्ठ बंधू देवदत्त दाभोलकर यांच्या विचाराने व कार्याने डॉ.नरेंद्र दाभोलकर प्रभावित असल्याचे दिसून येते.

संशोधन पद्धती:

कोणत्याही विषयाचे किंवा घटनेचे अध्ययन करीत असतांना ते वैज्ञानिक पद्धतीने होणे आवश्यक असते. या दृष्टीने प्रस्तुत संशोधन करण्यात येणार

आहे. सामाजिक संशोधन पद्धतीत सर्वात महत्वाचे कार्य म्हणजे तथ्य संकलन करणे होय. प्रस्तूत संशोधनातही प्राथमिक व द्‌वितीयक स्त्रोतांद्‌वारे तथ्य संकलन करण्यात आले आहे. द्‌वितीयक तथ्य संकलनासोबतच विशेषतः प्राथमिक तथ्य संकलन आणि निरीक्षण पद्धतीवर अधिक भर देण्यात येणार आहे.

प्राथमिक स्त्रोत :

संशोधन विषयाशी संबंधित व्यक्तीकडून मुलाखत अनुसूची किंवा प्रश्नावलीच्या माध्यमातून तसेच प्रत्यक्ष निरीक्षणाद्‌वारे जी माहिती किंवा तथ्ये गोळा केली जातात त्यास प्राथमिक स्त्रोत असे म्हणतात. स्वतः तथ्य संकलनाच्या तंत्राद्‌वारे तथ्यांचे संकलन केल्यामुळे ही तथ्ये अधिक वस्तुनिष्ठ असतात. प्रस्तुत संशोधनात तत्कालीन वृत्तपत्रे, शासकीय दस्तऐवज, प्रत्यक्षदर्शी तसेच हयात आंदोलकांशी मुलाखत, प्रत्यक्ष चर्चा यासारख्या प्राथमिक स्त्रोतांचा उपयोग तथ्य संकलनासाठी करण्यात येणार आहे.

द्‌वितीयक स्त्रोत :

संशोधनातील द्‌वितीयक स्त्रोत ही इतर व्यक्तीने पूर्वीच गोळा केलेली असून ती लिखित स्वरुपाची असतात. अशा तथ्याचा उपयोग संशोधनात होत असतो. प्रस्तुत संशोधनात संदर्भ ग्रंथ, शासकीय मासिके, शासकीय अहवाल, प्रकाशित ग्रंथ, अप्रकाशित साहित्य यांचा उपयोग करण्यात येणार आहे. अभिलेखे, वर्तमानपत्र, साप्ताहिके ई. द्‌वितीयक स्त्रोतांचाही उपयोग करण्यात येणार आहे. अशा द्‌वितीयक सामुग्रीचाही उपयोग प्रस्तुत संशोधनात करण्यात येणार आहे.

संशोधन आराखडा:

प्रस्तुत संशोधनाचा विषय “ पद्मश्री डॉ. नरेंद्र दाभोलकर जीवन आणि कार्य –एक ऐतिहासिक अभ्यास.” (इ.स.१९४५ ते २०१३) हा असून तो

वर्णनात्मक व गुणात्मक संशोधन कक्षेमध्ये येत असल्यामुळे या संशोधनासाठी प्राथमिक व द्वितीयक स्त्रोतांद्वारे तथ्यांचे संकलन करण्यात येणार आहे. प्रस्तुत संशोधनासाठी विश्लेषणात्मक संशोधन आराखड्याची (Analytical Research Design) निवड करण्यात येणार आहे.

तथ्य विश्लेषण :

प्रस्तुत संशोधनासाठी प्राप्त केलेल्या माहितीची वर्गवारी करून क्रम निश्चित करण्यात येणार आहे. संकलित तथ्याना अनूसरून प्राप्त माहितीच्या माध्यमातून त्याद्वारे तथ्य विश्लेषण करण्यात येणार आहे. याबरोबरच प्रस्तुत संशोधनात प्रत्यक्षदर्शी तसेच हयात आंदोलकांची मुलाखत, प्रत्यक्ष चर्चा यासारख्या तंत्रांचा तसेच अन्वेषणात्मक आराखडा, मूल्यमापन, यासारख्या विविध संशोधनातील तंत्राचा वापर करण्यात येणार आहे. यामाध्यमातून प्रस्तुत संशोधनात निष्कर्षाप्रत पोहचण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

संशोधनाची व्याप्ती व मर्यादा :

प्रस्तुत संशोधनासाठी व्याप्तीची निश्चिती करण्यात आली आहे. प्रस्तुत संशोधनासाठी अध्ययनाचे क्षेत्र हे महाराष्ट्रापुरतेच मर्यादित आहे.त्यातही आधुनिक महाराष्ट्रातील अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीतील डॉ.नरेंद्र दाभोलकर जीवन आणि कार्य – एक ऐतिहासिक अभ्यास इ.स.१९४५ ते २०१३ या कालावधीतील घटनांचा प्रामुख्याने अभ्यास करण्यात येणार आहे. याबरोबरच प्रस्तुत संशोधनात प्रत्यक्षदर्शी तसेच हयात आंदोलकांशी, मुलाखत, प्रत्यक्ष चर्चा यासारख्या तंत्रांचा तसेच अन्वेषणात्मक आराखडा, मूल्यमापन यासारख्या तंत्राद्वारे प्रस्तुत संशोधनात निष्कर्षाप्रत पोहचण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

प्रकरण योजना

प्रकरण पहिले - प्रस्तावना.

१) प्रस्तावना.

२) महाराष्ट्राची ऐतिहासिक पार्श्वभूमी.

३) महाराष्ट्रातील विविध सामाजिक चळवळींचा आढावा .

४) संशोधन विषयाचे महत्व-

५) संशोधनाची उद्दिष्टे -

६) संशोधनाची गृहीतके-

७) संशोधन पद्धती-

८) अभ्यासाचे क्षेत्र-

९) प्राथमिक स्त्रोत-

१०) द्वितीयक स्त्रोत-

११) संशोधनाची व्याप्ती व मर्यादा.

१२) संशोधन साहित्याचा आढावा.

प्रकरण दुसरे – स्वातंत्र्योत्तर कालखंडातील अंधश्रद्धा निर्मुलन कार्याचा आढावा.

१) अब्राहम कोवूर (श्रीलंका) यांचे कार्य .

२) बी.प्रेमानंद (केरळ) यांचे कार्य

३) प्रबीर घोष (बंगाल) यांचे कार्य.

४) नरेंद्र नायर यांचे कार्य

५) श्याम मानव (महाराष्ट्र) यांचे कार्य .

६) सनल एडमारुक यांचे कार्य.

७) जेम्स रँडी

प्रकरण तिसरे – पद्मश्री डॉ.नरेंद्र दाभोलकर यांच्या पुर्वजीवनाचा आढावा :

१) जन्म व बालपण .

२) कुटुंब वंशावळ .

३) डॉ.नरेंद्र दाभोलकर यांची जडण-घडण .

४) डॉ.नरेंद्र दाभोलकर यांचा स्वभाव व संस्कार.

५) डॉ.नरेंद्र दाभोलकर यांचे शिक्षण.

६) डॉ.नरेंद्र दाभोलकर यांच्या विचारावर प्रभाव असणाऱ्या व्यक्ती.

प्रकरण चौथे - पद्मश्री डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या क्रीडा क्षेत्रातील कामगिरीचा आढावा.

१) कबड्डी या खेळासाठी २० वर्ष योगदान.

२) महाराष्ट्रासह भारताचे संघनायक.

३) कबड्डीतला नरुभाऊ.

४) कबड्डीतली प्रसिद्ध हनुमानउडी.

५) क्रीडा संघटक.

६) क्रीडा स्तंभलेखक.

७) सामन्याचा धावता निवेदक.

प्रकरण पाचवे - पद्मश्री डॉ. नरेंद्र दाभोलकर यांनी विविध संघटनांमधून केलेले कार्य.

१) राष्ट्र सेवादलातील कार्य.
२) जयप्रकाश नारायण यांच्या चळवळीतील कार्य.
३) युक्रांदचे कुमार सप्तश्री यांच्या चळवळीतील कार्य.
४) बाबा आढाव यांच्या एक गाव-एक पाणवठा या चळवळीतील कार्य.
मराठवाडा नामांतर चळवळीतील कार्य.

प्रकरण सहावे - पद्मश्री डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मुलन समितीची स्थापना व कार्य.

१) प्रस्तावना
२) वैज्ञानिक दृष्टीकोन रुजवण्यासाठी प्रयत्न करणे .
३) कालसुसंगत धर्मचीकीत्सा करणे.

४) महाराष्ट्र जादूटोणा विरोधी विधेयक विधिमंडळात मंजूर व्हावे यासाठी केलेले प्रयत्न.

५) अंधश्रद्धांचे विविध प्रकार आणि त्यांची चिकित्सा करण्याच्या पद्धती.

६) महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मुलन समितीने उभारलेले लढे.

७) स्त्रिया आणि अंधश्रद्धा निर्मुलन परिषद.

८) भानामती प्रबोधन धडक मोहीम.

९) चमत्कार करून दाखवा आणि २१ लाख रुपये मिळवा.

प्रकरण सातवे – पद्मश्री डॉ.नरेंद्र दाभोलकर यांचे विविध वर्तमानपत्रे, साप्ताहिके व मासिके यातून केलेले लेखनकार्य.

१) साधना साप्ताहिकाचे संपादक म्हणून केलेले कार्य.

२) अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे अंधश्रद्धा निर्मूलन वार्तापत्र या मासिकातील लेखन कार्य.

३) विविध वृत्तपत्रांतून केलेले लेखन कार्य.

प्रकरण आठवे – उपसंहार व निष्कर्ष :

१) वरील प्रकरणांचा आढावा घेणे.

२) विविध संशोधक व विद्वानांची मते जाणून घेऊन उपलब्ध साधनांच्या आधारे वस्तुनिष्ठ निष्कर्ष मांडण्यात येतील.

३) गृहीतकांची पडताळणी .

संदर्भ ग्रंथ सूची.

१) डॉ. नरेंद्र दाभोलकर – भ्रम आणि निरास.

२) डॉ. नरेंद्र दाभोलकर – प्रश्नचिन्ह आणि पूर्णविराम.

३) डॉ. नरेंद्र दाभोलकर – अंधश्रद्धा विनाशाय.

४) डॉ. नरेंद्र दाभोलकर – विचार तर कराल.

५) डॉ. नरेंद्र दाभोलकर – श्रद्धा – अंधश्रद्धा.

६) डॉ. नरेंद्र दाभोलकर – लढे अंधश्रद्धेचे.

७) डॉ. नरेंद्र दाभोलकर – प्रश्न मनाचे.

८) डॉ. नरेंद्र दाभोलकर – ऐसे कैसे झाले भोंदू.

९) डॉ. नरेंद्र दाभोलकर – ठरलं डोळस व्हायचंच.

१०) डॉ. नरेंद्र दाभोलकर / सुबोध जावडेकर – विज्ञान आणि समाज.

११) डॉ. नरेंद्र दाभोलकर – प्रश्न तुमचा उत्तर दाभोलकरांचे.

१२) डॉ. नरेंद्र दाभोलकर – विवेकाचा आवाज.

१३) डॉ. नरेंद्र दाभोलकर / माधव बावगे – मती - भानामती.

१४) डॉ. नरेंद्र दाभोलकर – विवेकाची पताका घेऊ खांद्यावरी.

१५) डॉ. नरेंद्र दाभोलकर – पृथ्वी मोलाचा माणूस.

१६) डॉ. नरेंद्र दाभोलकर – तीमिरातुनी तेजाकडे.

१७) डॉ. नरेंद्र दाभोलकर – कबड्डी.

१८) प.रा.आरडे – तरुणाईसाठी डॉ.नरेंद्र दाभोलकर.

१९) डॉ.प्रदीप पाटणकर – भूतबाधा मनोविकार आणि अंधश्रद्धा.

२०) डॉ.संजयकुमार लढ्ढा व डॉ.मनीषा लढ्ढा –आरोग्य आणि अंधश्रद्धा

२१) संदीप जावळे – अंधश्रद्धा निर्मुलन प्रश्नचिन्ह आणि पूर्णविराम.

२२) भगत सिंघ – मै नास्तिक क्यों हू ?

२३) बसव प्रेमानंद – विज्ञान विरुद्ध चमत्कार.

२४) उत्तम कांबळे – अनिष्ट प्रथा .

२५) आढाव बाबा – एक गाव एक पाणवठा.

२६) डॉ.शंतनू अभ्यंकर (अनुवाद) – रिचर्ड डॉकिन्स – जादुई वास्तव.

२७) अब्राहम टी.कोवूर / शरद अभ्यंकर – बुवाबाजी हटाव.

२८)   अब्राहम टी.कोवूर – देव और दानव .

२९)   अब्राहम टी.कोवूर   -   ...और देव पुरुष हार गये

वृत्तपत्रे /साप्ताहिके /मासिके :

१) दै. लोकमत

२) दै. सकाळ

३) दै. लोकसत्ता

४) दै. सामना

५) दै. केसरी

६) दै. नवा-काळ

७) दै. महाराष्ट्र टाईम्स

८) साधना

९) अंधश्रद्धा निर्मुलन वार्तापत्र

संशोधक विद्यार्थी

आत्राम सतिश नामदेवराव

बी.ए , बी.एस.सी ,बी.एड.

एम.ए.(इतिहास) सेट.

मार्गदर्शक

प्राचार्य डॉ.विठ्ठलराव घुले

राजश्री शाहू महाविद्यालय ,परभणी.

.